# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : *coegondwana@gmail.com*

जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./ 83 . /२०१८

दिनांक :०६/०१/२०२१

## परिपत्रक

विषयः– "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक–यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ :–१.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्रं. संकीर्ण–२०१९/प्र.क्र.३५३/ताशि–४, दि.०१ डिसेंबर २०२०.
२.मा.सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपुर यांचे पत्र क्रं.तशिस/प्राकाना/शैवि–१/माहिती/२०२०/२२१३, दि.०१/१०/२०२०.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयांना तथा प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे अवेळी झालेल्या पावसामुळे शेती पिकांचे व बहुवार्षिक पिकाचे नुकसान झालेल्या आपतग्रस्त शेतक–यांच्या ज्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेले होते अशा विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफ करण्याचे आदेश शासन शुध्दीपत्रक संदर्भ क्रं. १ निर्गमित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने संदर्भिय पत्र क्र.२ नुसार पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यायक्रमनिहाय माहिती संदर्भिय पत्रातील विवरणपत्रात माहिती तात्काळ मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपुर यांना सादर करावी व त्याची एक प्रत विद्यापीठाला सादर करावी. सदर माहिती शासनास सादर न केल्यास व विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास संबधित महाविद्यालय जबाबदार राहिल याची नोंद घ्यावी.

सहपत्रः–
१.संदर्भिय पत्र क्रं. १ व २.

6.1.2021
(डॉ. अनिल झेड चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ..........
जावक क्र. 51 दि. 2/1/2021

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
क्र. 127. दि. 02/01/2021

"क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३५३/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०१ डिसेंबर, २०२०

वाचा : १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२०१९/ प्र.क्र.१९१/म-३, दि.१८ नोव्हेंबर,२०१९
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३५३/तांशि-४, दि.२२ नोव्हेंबर, २०१९
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रमांक-सीएलएस-२०१९/ प्र.क्र.१९१/म-३, दिनांक २५ नोव्हेंबर, २०२०

शासन शुध्दीपत्रक :-

उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकातील अनुक्रमांक १ मधील " राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३२५ तालुक्यांमधील" याऐवजी "राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३४९ तालुक्यांमधील" असे वाचण्यात यावे.

२. ३४९ तालुक्यांचे यादी सोबत जोडली आहे.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१२०११५०६२००३०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

DBoEE कार्यवाही घेवुन अहवाल सादर करावा
2/1/2021

प्रति,
१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
२. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड

प्रत :
१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये.

AR(Exam.)
2/1/21
2/1/2021

५) सर्व उपसचिव/कार्यासन क्र.विशि-३/तांशि-३/साशि-१/ताशि-५, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

६) महसूल व वन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग / विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग / वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग /कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई

७) निवड नस्ती (तांशि-४).

शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३५३/तांशि-४, दि.१ डिसेंबर, २०२०

सोबतचे सहपत्र

ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मधील अवेळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसानीमुळे बाधित झालेले तालुके.

| अ.क्र. | जिल्हा | बाधित तालुके (नांवे) | बाधित तालुके (संख्या) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ठाणे, कल्याण, अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, भिवंडी. | ०६ |
| २ | पालघर | पालघर, डहाणू, तलासरी, वसई, वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड | ०८ |
| ३. | रायगड | अलबाग, मुरुड, पेण, खालापूर, उरण, कर्जत, पनवेल, माणगाव, तळा, पाली/सुधागड, रोहा, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, | १५ |
| ४ | रत्नागिरी | रत्नागिरी, राजापूर, लांजा, चिपळूण, संगमेश्वर, गुहागर, दापोली, खेड, मंडणगड | ०९ |
| ५ | सिंधुदुर्ग | कणकवली, मालवण, देवगड, वैभववाडी, सावंतवाडी, वेंगुर्ला, दोडामार्ग, कुडाळ. | ०८ |
| ६ | धुळे | धुळे, साक्री, शिंदखेड, शिरपूर | ०४ |
| ७ | जळगांव | अमेळनेर, चोपडा, एरंडोल, धरणगाव, पारोळा, जळगाव, भुसावळ, बोदवड, यावल, रावेर, मुक्ताईनगर, भडगाव, चाळीसगाव, जामनेर, पाचोरा. | १५ |
| ८ | नाशिक | मालेगाव, सटाणा, नांदगाव, कळवण, दिंडोरी, देवळा, सुरगाणा, नाशिक, ईगतपुरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, निफाड, चांदवड, येवला, सिन्नर. | १५ |
| ९ | नंदूरबार | नंदूरबार, नवापूर, शहादा, अक्राणी, तलोदा, अक्कलकुवा. | ०६ |
| १० | कोल्हापूर | करवीर, कागल, राधानगर, गगणबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, हातगणंगले, शिरोळ, गडहिंग्लज, आजरा, भुदरगड, चंदगड | १२ |
| ११ | सातारा | कराड, पाटण, वाई, जावळी महाबळेश्वर, खंडाळा, सातारा, कोरेगाव, खटाव, फलटण, माण. | ११ |
| १२ | सांगली | कवठेमहाकाळ, जत, तासगाव, आटपाडी, पलुस, खानापूर, कडेगाव, वाळवा, शिराळा, मिरज. | १० |
| १३ | पुणे | मुळशी, भोर, मावळ, वेल्हे, जुन्नर, खेड, आंबेगोव, शिरुर, बारामती, दौंड, पुरंदर, इंदापूर, पुणे हवेली. | १३ |
| १४ | अहमदनगर | रहाता, नेवासा, कोपरगांव, कर्जत, श्रीगोंदा, संगमनेर, अकोले. श्रीरामपूर, शेवगाव, जामखेड, नगर, पाथर्डी, पारनेर, राहुरी. | १४ |
| १५ | सोलापूर | द.सोलापूर, उ. सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, सांगोला, बार्शि, म्हाडा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा. | ११ |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद, पैठण, फुलब्री, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, कन्नड, सोयगाव. | ०९ |
| १७ | जालना | जालना, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, अंबड, परतूर, मंठा, घनसांगवी. | ०८ |

ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मधील अवेळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसानीमुळे बाधित झालेले तालुके.

| अ.क्र. | जिल्हा | बाधित तालुके (नांवे) | बाधित तालुके (संख्या) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ठाणे, कल्याण, अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, भिवंडी. | ०६ |
| २ | पालघर | पालघर, डहाणू, तलासरी, वसई, वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड | ०८ |
| ३. | रायगड | अलबाग, मुरुड, पेण, खालापूर, उरण, कर्जत, पनवेल, माणगाव, तळा, पाली/सुधागड, रोहा, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, | १५ |
| ४ | रत्नागिरी | रत्नागिरी, राजापूर, लांजा, चिपळूण, संगमेश्वर, गुहागर, दापोली, खेड, मंडणगड | ०९ |
| ५ | सिंधुदुर्ग | कणकवली, मालवण, देवगड, वैभववाडी, सावंतवाडी, वेंगुर्ला, दोडामार्ग, कुडाळ. | ०८ |
| ६ | धुळे | धुळे, साक्री, शिंदखेड, शिरपूर | ०४ |
| ७ | जळगांव | अमेळनेर, चोपडा, एरंडोल, धरणगाव, पारोळा, जळगाव, भुसावळ, बोदवड, यावल, रावेर, मुक्ताईनगर, भडगाव, चाळीसगाव, जामनेर, पाचोरा. | १५ |
| ८ | नाशिक | मालेगाव, सटाणा, नांदगाव, कळवण, दिंडोरी, देवळा, सुरगाणा, नाशिक, ईगतपुरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, निफाड, चांदवड, येवला, सिन्नर. | १५ |
| ९ | नंदूरबार | नंदूरबार, नवापूर, शहादा, अक्राणी, तलोदा, अक्कलकुवा. | ०६ |
| १० | कोल्हापूर | करवीर, कागल, राधानगर, गगणबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, हातगणंगले, शिरोळ, गडहिंग्लज, आजरा, भुदरगड, चंदगड | १२ |
| ११ | सातारा | कराड, पाटण, वाई, जावळी महाबळेश्वर, खंडाळा, सातारा, कोरेगाव, खटाव, फलटण, माण. | ११ |
| १२ | सांगली | कवठेमहाकाळ, जत, तासगाव, आटपाडी, पलुस, खानापूर, कडेगाव, वाळवा, शिराळा, मिरज. | १० |
| १३ | पुणे | मुळशी, भोर, मावळ, वेल्हे, जुन्नर, खेड, आंबेगोव, शिरुर, बारामती, दौंड, पुरंदर, इंदापूर, पुणे हवेली. | १३ |
| १४ | अहमदनगर | रहाता, नेवासा, कोपरगांव, कर्जत, श्रीगोंदा, संगमनेर, अकोले. श्रीरामपूर, शेवगाव, जामखेड, नगर, पाथर्डी, पारनेर, राहुरी. | १४ |
| १५ | सोलापूर | द.सोलापूर, उ. सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, सांगोला, बार्शि, म्हाडा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा. | ११ |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद, पैठण, फुलब्री, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, कन्नड, सोयगाव. | ०९ |
| १७ | जालना | जालना, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, अंबड, परतूर, मंठा, घनसांगवी. | ०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | बीड | बीड, माजलगाव, गेवराई, वडवणी, अंबेजोगाई, केज, परळी, पातोदा, शिरुर (कसार), आष्टी, धारूर. | ११ |
| १९ | लातूर | लातुर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुन अनंतपाळ, उदगीर, अहमदपूर, जळकोट, देवणी, चाकूर. | १० |
| २० | उस्मानाबाद | उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, भुम, परांडा, वाशी, कळंब. | ०८ |
| २१ | हिंगोली | हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा-नागनाथ, सेनगांव | ०५ |
| २२ | परभणी | परभणी, सेलु, मानवत, गंगाखेड, जिंतुर, पुर्णा, सोनपेठ, पाथरी, पालम. | ०९ |
| २३ | नांदेड | नांदेड, अर्धापूर, मुदखेड, कंधार, लोहा, देगलुर, मुखेड, नायगाव, बिलोली, धर्माबाद, किनवट, माहुर, हिमायतनगर, हदगांव, भोकर, उमरी. | १६ |
| २४ | अमरावती | अमरावती, भातकुली, नांदगांव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, मोर्शी, वरुड, चांदुर बाजार, तिवसा, धारणी, अचलपुर, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा. | १४ |
| २५ | अकोला | अकोट, तेल्हार, बाळापूर, पातुर, अकोला, बार्शिटाकळी, मुर्तिजापूर. | ०७ |
| २६ | यवतमाळ | यवतमाळ, कळंब, घाटंगी, राळेगांव, दारव्हा, नेर, आर्णी, बाभुळगांव, पुसद, दिग्रस, उमरखेड, महागांव, पांढरकवडा, वणी, मोरगांव, झरी. | १६ |
| २७ | वाशिम | वाशिम, मालेगाव, रिसोड, मंगरुळपीर, मानोरा, कारंजा. | ०६ |
| २८ | बुलढाणा | बुलढाणा, मलकापुर, चिखली, मोताळा, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगांव राजा, खामगाव, शेगांव, संग्रामपुर, नांदुरा, जळगांव जामोद. | १३ |
| २९ | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, हिंगणघाट, समुद्रपूर, करंजा, आष्टी. | ०८ |
| ३० | नागपूर | रामटेक, उमरेड, नागपूर ग्रामीण, कामठी, पारशिवनी, मौदा, काटोल, नरखेड, सावनेर, कळमेश्वर, भिवापुर, कुही. | १२ |
| ३१ | चंद्रपूर | चंद्रपूर, बल्लारपूर, मुल, सावली, वरोरा, भद्रावती, चिमुर, नागभिड, सिंदेवाही, ब्रम्हपुरी, राजुरा, कोरपना, गोंडपिंपरी, पोंभुर्णा. | १४ |
| ३२ | भंडारा | भंडारा, मोहाडी, तुमसर, पवनी, सोकोली, लाखनी, लाखांदूर. | ०७ |
| ३३ | गोंदिया | गोंदिया, गोरेगांव, तिरोडा, अर्जुनी-मोर, देवरी, सालेकसा, सडक-अर्जुनी, आमगांव. | ०८ |
| ३४ | गडचिरोली | गडचिरोली, चार्मोशी, धानोरा, मुलचेरा, वडसा, आरमोरी, करखेडा, कोरची, अहेरी, भामरागड, सिरोंचा | ११ |
| | | एकुण तालुके | ३४९ |

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/46

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्र.तांशिस/प्राकाना/शैवि-1/ माहिती/2020/ 2213 दिनांक:- 1 OCT 2020

प्रति,

कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर

विषय:- दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

दुष्काळ परिस्थिती तसेच " क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/2019/864, दिनांक 29.11.2019 अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

त्यानुसार महसूल व वन विभागाच्या दिनांक 18.11.2019 च्या शासन निर्णयानुसार राजयातील 34 जिल्हयातील 325 तालुक्यांमधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतक-यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्याचे आदेश शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार खालील विवरणपत्रातील पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमनिहाय माहिती तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करावयाची असल्याने सदरहू **माहिती या कार्यालयास आज सायंकाळ 05 वाजेपर्यंत खालील तक्यात सादर करावी.**

| | शुल्क माफीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची नांवे व शिकत असलेल्या व्यवसायीक संस्थानिहाय | परीक्षा शुल्कमाफीसाठी प्रत्यक्षात अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | शासन परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत केले अशा विद्यार्थ्यांची संख्या व नांवे | परीक्षा शुल्क माफिसाठी खर्च करण्यात आलेल्या रकमेची माहिती |
|---|---|---|---|---|
| पदविका | | | | |
| पदवी | | | | |
| पदव्युतर पदवी | | | | |

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र. २अ) यांना माहितीकरीता सविनय सादर.

G:\Meshram Degree File\Letters\Letter to University.doc

Scanned with CamScanner

"क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३५३/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०१९

**वाचा :** १) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/१०/१९९३
२) महसूल व वन विभागं, शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२०१९/प्र.क्र.१९१/म-३, दिनांक १८ नोव्हेंबर,२०१९
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एससीवाय-११/२०१९/प्र.क्र.८१/म-११, दिनांक १९ नोव्हेंबर,२०१९

**परिपत्रक** :

महसूल व वन विभागाच्या वर अनुक्रमांक २ येथील दिनांक १८ नोव्हेंबर,२०१९ च्या शासन निर्णयाव्दारे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर,२०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३२५ तालुक्यामध्ये शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झालेल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना विशेष दराने मदत व सवलती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या शासन निर्णयाव्दारे आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना विविध सवलती जाहिर करण्यात आल्या असून त्यापैकी एक सवलत "शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परीक्षा शुल्कामध्ये माफी" ही आहे. याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार सविस्तर आदेश निर्गमित करावेत व त्याबाबत आवश्यक निधीची तरतूद करुन ती माफ करण्यात यावी, अशा स्वरुपाचे आदेश देण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार फायदा देण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश सर्व विद्यापीठांना तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळास देण्यात येत आहेत :-

१) महसूल व वन विभागाच्या दिनांक १८ नोव्हेंबर,२०१९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यांमधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतकऱ्यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांकरीता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे.

२) या शासन परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत करण्यात यावे.

३) या सवलतीचा लाभ केवळ आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांपूरता मर्यादित राहिल. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखाली शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना ५०% परीक्षा शुल्क शिष्यवृत्तीच्या स्वरुपात देण्यात येत असल्याने, या योजनेखाली परीक्षा शुल्काच्या केवळ ५० % इतकी रक्कम माफ करण्यात यावी. रुपये ८.०० लाख पर्यंत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या उर्वरित विद्यार्थ्यांना १०० % परीक्षा शुल्काची रक्कम माफ करण्यात यावी.

४) या योजनेवरील परीक्षा शुल्क माफीसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज प्राप्त करुन घेण्याची, विद्यार्थ्यास या सवलतीसाठी पात्र ठरविण्याची आणि त्याप्रमाणे विद्यापीठाकडे / मंडळाकडे परीक्षा शुल्काची मागणी करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

५) यासाठी होणारा खर्च सर्व संबंधित विद्यापीठांनी तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने स्वत:च्या जमा निधीतून भागवावा.

६) हे आदेश स्वायत्त संस्थांना देखील लागू राहतील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९११२२१६०१३१५२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.11.22 17:14:55 +05'30'

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
२. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड

प्रत :

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये.
५) सर्व उपसचिव/कार्यासन क्र.विशि-३/तांशि-३/साशि-१/ताशि-५, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महसूल व वन विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग / विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग / वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग /कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई
७) निवड नस्ती (तांशि-४).